# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा
# वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा व कलावंत मेळावा.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व कलावंत मेळावा १७ जून २०१२ रोजी सकाळी १० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे साजरा करण्यात आला. नाट्य क्षेत्रातील विविध स्तरांवर उल्लेखनीय कार्य केलेल्या एकूण ५७ रंगकर्मींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. यावर्षीचे जीवनगौरव पुरस्कार श्री. सतीश आळेकर आणि श्रीमती सुहास जोशी यांना देण्यात आले. या सोहळ्याला मुंबई येथील नाट्यरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. त्यावेळी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करण्यात आले.

१४ जून २०१२ रोजी होणाऱ्या गोविंद बल्लाल देवल स्मृतीदिनाचा भाग म्हणून युवा रंगकर्मींसाठी एक दिवसाची कार्यशाळा सकाळ १०.०० ते सायं. ६.०० वाजेपर्यंत घेण्यात आली. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील रंगकर्मींना बोलविण्यात आले होते. त्यांना श्री. सतीश आळेकर, श्री. चंद्रकांत कुलकर्णी, श्री. राजन भिसे, श्री. वामन केंद्रे, श्री. विजय केंकरे आणि श्री. कुमार सोहनी यांनी मार्गदर्शन केले.

## एकांकिका स्पर्धा

नाट्य परिषदेतर्फे शाखां-शाखांत व घटक संस्थांमध्ये 'कै. प्रा. डॉ. लक्ष्मणराव देशपांडे एकांकिका स्पर्धा' ही राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सुरू करण्यात आली. यावर्षीच्या एकांकिका स्पर्धेत नाट्य परिषदेच्या ५० शाखांपैकी १९ शाखांनी भाग घेतला होता. एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी नाट्य परिषदेच्या यशवंत नाट्य मंदिर, माटुंगा, मुंबई येथील नाट्यगृहात रंगभूमिदिनी दिनांक ५ नोव्हेंबर २०१२ रोजी घेण्यात आली, अंतीम फेरीसाठी निवडण्यात आलेल्या पाच एकांकिकामधून पहिल्या तीन एकांकिकांना रोख बक्षीसे देण्यात आली.
ती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | सर्वोत्कृष्ट एकांकिका | एकांकिकेचे नांव | शाखेचे नांव | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम | रास्कल | नाशिक | १५,००० |
| २ | द्वितीय | आर्टिफिशएन इंटलिजन्स् | अहमदनगर | ११,००० |
| ३ | तृतीय | कुकूटवध | संगमनेर | ८,००० |

तसेच लेखन, दिग्दर्शन, उत्कृष्ट स्त्री आणि पुरूष कलावंत, नेपथ्य, प्रकाशयोजना यासाठीही पारितोषिके प्रत्येकी प्रथम क्रमांक रू. १०००/- द्वितीय क्रमांक रू. ७५०/- आणि तृतिय क्रमांक रू. ५००/- देण्यात आली. तसेच प्रत्येक विभागासाठी उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम त्याचदिवशी सांस्कृतिक कार्य संचालक श्री. अशुतोष घोरपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. अंतीम स्पर्धेचे परिक्षक म्हणून श्री. सतीश सलागरे, श्री. चंद्रकांत मेहेंदळे आणि श्री. मंगेश कदम यांनी काम पाहिले. स्पर्धा नियोजन समितीमध्ये श्री. शिवाजी शिंदे, श्री. सतीश लोटके, श्री. दिगंबर आगाशे आणि श्रीमती गीता सोमण यांचा समावेश होता.